CMYK

बीड । शुक्रवार
३०.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ५९
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 




# आता चिंता मिटली !
## शेतकऱ्यांना मिळणार ४% दराने ५ लाखांपर्यंतचे कर्ज

**● शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकार वेळोवेळी नवनवीन योजना सुरू करते. आज आपण अशाच एका योजनेबद्दल बोलणार आहोत ज्या अंतर्गत शेतकऱ्यांना केवळ ४ टक्के व्याजाने लाखो रुपयांचे कर्ज मिळेल. आपण याच योजनेशी संबंधित संपूर्ण प्रक्रिया सविस्तरपणे समजून घेऊया. तसेच, यासाठी कोणती पात्रता आवश्यक आहे, तेही पाहूया.**

**नवी दिल्ली**

शेतकऱ्यांना केसीसी (किसान क्रेडिट कार्ड) द्वारे कमी व्याजावर मोठी रक्कम कर्जाऊ दिली जाते. या योजनेचा लाभ देशातील कोणताही शेतकरी घेऊ शकतो. तथापि, त्यासाठी योजनेशी संबंधित पात्रता पूर्ण करणे आवश्यक आहे.

सर्वात आधी जाणून घेऊया की किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत किती रुपयांपर्यंत कर्ज दिले जात आहे.

**● किती रुपयांचे कर्ज मिळत आहे?**

किसान क्रेडिट कार्डद्वारे शेतकऱ्यांना अल्प मुदतीचे कर्ज दिले जाते. यामध्ये शेतकऱ्यांना ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळू शकते. हे कर्ज साधारणपणे ७ टक्के दराने मिळते. योजनेच्या ९ टक्के कर्जातून २ टक्के सबसिडी वजा केली जाते. तसेच, जर शेतकऱ्याने कर्जाची परतफेड वेळेवर केली, तर ४ टक्के व्याजानेही कर्ज मिळू शकते.

पात्रता काय असेल?

जर कोणताही शेतकरी बांधव कर्जासाठी अर्ज करू इच्छित असेल, तर त्याला खालील पात्रता पूर्ण करावी लागेल.

या योजनेसाठी विविध प्रकारचे शेतकरी पात्र आहेत, जसे की- पशुपालन करणारे शेतकरी, परवानाधारक मच्छिमार, किंवा ज्यांच्याकडे मासेमारीसाठी नाव आहे, कुक्कुटपालन करणारे शेतकरी, बटाईदार शेतकरी, भाडेकरू शेतकरी, ज्यांच्याकडे स्वतःची शेती आहे, दुग्ध व्यावसायिक शेतकरी

कोणती कागदपत्रे आवश्यक असतील? या योजनेत अर्ज करण्यासाठी तुम्हाला खालील कागदपत्रांची आवश्यकता भासू शकते-

मतदार ओळखपत्र, पॅन कार्ड किंवा आधार कार्ड आवश्यक असेल. ही कागदपत्रे ओळखपत्र आणि पत्त्याचा पुरावा म्हणून मागितली जाऊ शकतात.

**● योजनेसाठी अर्ज कसा करावा?**

जर तुम्हाला केसीसी (किसान क्रेडिट कार्ड) साठी अर्ज करायचा असेल, तर खालील पायऱ्या फॉलो कराव्या लागतील.

**● पायरीनुसार प्रक्रिया**

पायरी 1- सर्वात आधी तुम्हाला पीएम किसानच्या अधिकृत वेबसाइटवर जावे लागेल.
पायरी २- येथे तुम्हाला किसान क्रेडिट कार्डशी संबंधित अर्ज डाउनलोड करावा लागेल.
पायरी ३- आता या अर्जात विचारलेली माहिती आणि कागदपत्रे जमा करा.
पायरी ४- यानंतर अर्जात भरलेली माहिती काळजीपूर्वक वाचा. त्यानंतर तो सबमिट करा. पडताळणी झाल्यानंतर काही दिवसांतच तुम्हाला बँकेकडून किसान क्रेडिट कार्ड मिळेल.

अशा प्रकारे तुम्ही योजनेसाठी सहज अर्ज करू शकता.

# बीड शहरात पूर परिस्थिती उद्भवू नये यासाठी उपाययोजना करा

**▸ आ.संदीप क्षीरसागरांची प्रशासनाकडे मागणी**



**पूल कम बंधाऱ्याच्या कामाची गती वाढविण्याच्या सूचना**

**बीड शहरातील बार्शी रोडवरील बिंदुसरा नदीपात्रात पूल कम बंधार्याचे काम सुरू आहे. पाणीपातळीत वाढ होण्याअगोदर हे काम ठराविक स्तराच्या पुढे असणे आवश्यक आहे. परंतु सध्याच्या कामाच्या गती पेक्षा अधिक गतीने हे काम होणे गरजेचे आहे. आ.संदीप क्षीरसागर यांनी गुरुवारी (दि.२९) रोजी सदरील कामाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाची गती वाढविण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला केल्या.**

**बीड । प्रतिनिधी**

यावर्षी पावसाळ्यापूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे बीड शहराच्या जवळच असलेले बिंदुसरा धरण जवळपास ८० टक्के भरले आहे. पावसाळपूर्वी अतिवृष्टीमुळेच धरण ८० टक्के भरले आहे तर येत्या पावसाळ्यात पावसाची आवक वाढल्यानंतर बिंदुसरा नदीला पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने उपाययोजना कराव्यात अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. बीड शहरातून बिंदुसरा आणि करपरा या दोन नद्या वाहतात. यावर्षी मान्सूनपूर्व अतिवृष्टी ▶▶ उर्वरित पान २ वर

# धनंजय मुंडेंच्या प्रयत्नांना यश; धर्मापुरी किल्ला संवर्धनासाठी 3 कोटी 39 लाख

**▸ अंबाजोगाई येथील बारा खांबी सह खोलेश्वर मंदिरास भरघोस निधी**



**मुंबई । प्रतिनिधी**

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांना मोठे यश आले असून आज पर्यटन विभागाकडून परळी मतदारसंघातील प्रसिद्ध धर्मापुरी किल्लयाच्या संवर्धन व जतन कामासाठी तीन कोटी ३९ लाख रुपयांच्या निधी खर्चनास शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे. धनंजय मुंडे यांनी याबाबत सातत्याने मागणी केली होती. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असताना धनंजय मुंडे यांनी धर्मपुरी किल्लयाच्या जतन व संवर्धनासाठी एकूण नऊ कोटी रुपयांची मागणी केली होती त्यापैकी साधारण तीन कोटी ३९ लाख रुपयांच्या निधी खर्च शासन निर्णयाद्वारे आज म ान्यता देण्यात आले आहे.

त्याचबरोबर अंबाजोगाई शहरालगत असलेल्या पुरातत्व विभागांनी विशेष भाग म्हणून घोषित केलेल्या सकलेश्वर मंदिर अर्थात बाराखडी नावाने प्रसिद्ध असलेल्या स्थळाच्या विकासासाठी सुमारे ३५ लाख रुपये, तसेच सुप्रसिद्ध खोलेश्वर मंदिर परिसराच्या विकासासाठी सुमारे ४५ लाख रुपये निधी करतात शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये धनंजय मुंडे यांनी धर्मापुरी किल्लयासह बारा खांबी मंदिर व खोलेश्वर मंदिर यांच्या परिसराच्या विकासासाठी निधी देण्याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांना विनंती केली होती.

धर्मपुरी येथील भुईकोट किल्ला हा ▶▶ उर्वरित पान २ वर

# बदलीसंदर्भात गटशिक्षणधिकाऱ्यांकडे तक्रार; शिक्षकासह त्याच्या मुलाने केला दोघांवर कोयत्याने हल्ला

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील गुंडागर्दी आणि दादागिरी थांबायचे नाव घेत नाही. जिल्हा परिषदेच्या एका वस्तीशाळा शिक्षकाने त्याच्या बदली संदर्भात गटशिक्षणधिकारी यांच्याकडे तक्रार का केली? या रागातून त्याने आणि त्याच्या दोन मुलांनी तक्रारदार आणि त्याच्या भावावर कोयत्याने वार करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे.

या बाबतची अधिक माहिती अशी की, केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील हनुमान वस्ती शाळेवर गोकुळ सारून नावाचे वस्तीशाळा शिक्षक कार्यरत आहेत. त्यांच्या बाबतीत गावकऱ्यांच्या अनेक तक्रारी




आहेत. आज (दि. २९) सकाळी ८.३० च्या सुमारास भारत सुदाम चाटे व त्यांचा भाऊ पप्पू चाटे हे दोघे भाऊ वडवणी येथे शेतातील भुईमुगाच्या शेंगा विकण्यासाठी जात होते. ते दोघे मेंढीच्या ओघळात असलेल्या लमाणबाल नावाने ओळखल्या जात असलेल्या भागात आले असता तेथे वस्ती शाळा शिक्षक गोकुळ सखाराम सारुक आणि त्यांची मुले आप्पाराव गोकुळ सारुक श्रीकृष्ण गोकुळ सारुक हे हातात कोयता आणि कुऱ्हाड घेऊन आले.

यावेळी त्यांना उद्देशून म्हणाले की, तुम्ही गट शिक्षण अधिकारी यांच्याकडे माझी बदली करण्याबाबत तक्रार अर्ज का दिला ? असे म्हणुन तुम्ही लइ माजलात काय ? असे म्हणून शिवीगाळ केली. त्यानंतर सहशिक्षक गोकुळ सारुक याने त्याच्या हातातील ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड शहरातील मुख्य रस्त्यावर लोकसहभागातून वृक्षलागवड

**डॉ.योगेश क्षीरसागर यांची माहिती; बीडमध्ये सामाजिक संघटनांसोबत नियोजनार्थ बैठक**

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार हे शहरात आल्यानंतर अधिकाधिक वृक्ष लागवड व्हावी, यासंदर्भात आग्रही असतात. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी विवेक ▶▶ उर्वरित पान २ वर



# राष्ट्रीय महामार्ग-61, व 548 वर स्कार्पियो पलटी, जीवीत हानी नाही

**माजलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग-६१ व ५४८(पंढरपूर -खामागाव )या दोन संयुक्त महामार्गांवर असलेल्या माजलगाव शहाराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलशुद्धीकरण केंद्राच्या पुढे २००मीटर अंतरावर माजलगावातुन स्कार्पियोच्या पुढे कुत्रा आडवा आलेल्यान



चालकाचा ताबा सुटला आणि बाजुचे स्कार्पियोन दोन पलट्या मारल्या पण यात जीवीत हानी झाली नाही. या अपघाताची समजलेली माहिती अशी की, माजलगाव शहरातील नवनाथ नगर भागात राहणारे रहिवासी तथा धर्मनाथ अर्बन मल्टिपल निधीचे चेअरमन मुकुंद जोगडे हे त्यांच्या स्कार्पियो जीप क्रं.एमएच-४४/ झेड ५७५७मधुन माजलगाव येथुन नमुद ठिकाणी महामार्गावर २९मे रोजीच्या सकाळी ११वा च्या सुम ारास प्रवासात असताना भरधाव वेगात असलेल्या गाडी समोर कुत्रा आडवा आलेल्यान चालकाचा ताबा सुटला आणि स्कार्पियोन दोन पलट्या मारल्या यात मोठे नुकसान झाले पण ▶▶ उर्वरित पान २ वर

# फडणवीस सरकारचा मोठा निर्णय; १ जूनपासून मंत्रालयात स्वीकारली जाणार नाही कागदी फाईल

**मुंबई । प्रतिनिधी**

शासकीय कामकाजात आता ई ऑफिसचा वापर बंधनकारक करण्यात आला असून, येत्या १ जूनपासून मंत्रालयात कागदी फाईल स्वीकारल्या जाणार नसून कागदी फाईल स्वीकारण्यास शासनाने मनाई केली आहे. सरकारच्या या निर्णयामुळे एका टेबलवरून दुसऱ्या ठेबलवर



जाणाऱ्या फाईलचा वेग वाढण्यास आणि नागरिकांची कामे मार्गी लागण्यास मदत होणार आहे. १ जूनपासून कागदी फाईलऐवजी फक्त ई फाईल स्वरुपात सादर करण्याचे आदेश देण्यात आले असून, नुसत्या स्कॅन करून पाठवलेल्या ई फाईल स्विकारल्या जाणार नाहीत नसल्याचेही जारी करण्यात आलेल्या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

शासनाच्या परिपत्रकात नेमकं काय? शासकीय कामकाजात संगणकाचा अधिकाधिक वापर करून शासकीय कामकाज ▶▶ उर्वरित पान २ वर

# नवऱ्यानं दुसरं लग्न केलं, बायकोचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहनाचा प्रयत्न



**धाराशिव । प्रतिनिधी**

धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एका महिलेनं अंगावर पेट्रोल ओतून स्वतः पेटवून घेण्याचा प्रयत्न केला. आत्महत्या करण्याचा प्रयत्न करण्याचं कारण होतं नवऱ्याचं दुसरं लग्न. पहिल्या पत्नीला सोडून एका व्यक्तीनं दुसरीसोबत संसार मांडला, त्यानंतर पहिल्या पत्नीनं जिल्हाधिकारी कार्यालयासम ोर आत्मदहनाचा प्रयत्न केला.

नवऱ्यानं दुसऱ्या महिलेसोबत संसार मांडल्याचा राग मनात धरत पहिल्या पत्नीने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. महिलेच्या या घटनेनं जिल्हाधिकारी कार्यालयात खळबळ उडाली. आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या महिलेनं पोलिसांवरही गंभीर आरोप केलेत. धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयात नेहमी सारखी वर्दळ होती. दुपारी एक महिला आली. महिलेने आपल्या पतीविरोधात आरोप त्याची तक्रार करण्यास सुरुवात केली. पोलीस तिची तक्रार नोंदवून घेत नसल्यानं तिनं पोलिसांच्या नावाने जिल्हाधिकारी कार्यालयात त्याची तक्रार दिली. परंतु आपली तक्रार नोंदवण्यास कोणी तयार नसल्यानं तिनं आव बघितला ना ताव थेट अंगावर पेट्रोल टाकून जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.

महिलेचा हा प्रकार पाहून येथील कर्मचारी धास्तावले. महिला पुढे काही अनुचित प्रकार करेल तोच महिला पोलिसांनी प्रसंगावधान साधत महिलेला पकडलं. महिलेच्या हातातून पेट्रोल आणि आगपेटी हिसकावून घेतली.

▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK

# आता मन:शांती...मंत्रीपद गेलं, वादाच्या भोवऱ्यातही अडकले !

## आता, धनंजय मुंडे इगतपुरीच्या विपश्यना केंद्रात दाखल

मंत्रीपदाचा राजीनामा, संतोष देशमुख प्रकरणात होणारे गंभीर आरोप, करुणा शर्मांचे आरोप अशा कोणत्या ना कोणत्या कारणाने वादाच्या भोवऱ्यात अडकलेले अजित पवार गटाचे आमदार धनंजय मुंडे आता मन:शांतीकडे वळाले आहेत. धनंजय मुंडे आता इगतपुरीच्या विपश्यना केंद्रात दाखल झाले आहेत . धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर त्यांचे खाते राष्ट्रवादीच्या छगन भुजबळ यांना देण्यात आले .त्यानंतर धनंजय मुंडे थेट विपश्यना करण्यासाठी इगतपुरीच्या विपश्यना केंद्रात गेल्या आठ दिवसांपासून असल्याची माहिती समोर आली आहे .

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचे क्रूर छायाचित्र आणि व्हिडिओ समोर आल्यानंतर धनंजय मुंडेंना अन्न व नागरी पुरवठा खात्याचा राजीनामा द्यावा लागला होता .संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांच्यावर अनेक गंभीर आरोप करण्यात आले होते .राजीनाम्यानंतरही करुणा मुंडे यांच्या गंभीर व खळबळ जनक आरोपांमुळे धनंजय मुंडे सातत्याने वादाच्या भोवऱ्यात अडकले होते . दरम्यान, राजीनाम्यानंतर अन्न व नागरी पुरवठा खात्याची जबाबदारी राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांना दिल्यानंतर मंत्रिमंडळात पुन्हा येण्याची मुंडेंची आशा मावळल्याची चर्चा आहे .



धनंजय मुंडे इगतपुरीच्या विपश्यना केंद्रात– मागील आठ दिवसांपासून अजित पवार गटाचे आमदार धनंजय मुंडे नाशिक मधील इगतपुरीच्या विपश्यनाकेंद्रामध्ये दाखल झाले आहेत .बीड मधील संतोष देशमुख हत्या प्रकरणांमध्ये त्यांच्यावर गंभीर आरोप झाले होते . नंतर धनंजय मुंडेंना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता .गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने चर्चेत असलेले धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर त्यांच्या खात्याची जबाबदारी अजित पवार गटाच्या छगन भुजबळ यांना दिल्यानंतर धनंजय मुंडे आता थेट विपश्यना करण्यासाठी इगतपुरीच्या विपश्यना केंद्रामध्ये गेले आहेत . इगतपुरीच्या विपश्यनाकेंद्रात दहा दिवसांच्या विपश्यनेसाठी ते दाखल झाल्याचा सांगण्यात येतंय .

सातत्याने वादाच्या भोवऱ्यात– मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडात कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांचे जवळचे सहकारी वाल्मीक कराड याला आरोपी करण्यात आल्यानंतर मंत्री धनंजय मुंडे यांनी ४ मार्च २०२५ रोजी मंत्रीपदाचा राजीनामा दिला . हत्या प्रकरणावर होऊन धनंजय मुंडेंच्या राजीनामाची मागणी सातत्याने होत होती .यानंतर धनंजय मुंडे यांनी स्वत: ट्विट करत राजीनामाची घोषणा केली होती .त्यांनी केलेल्या ट्वीटमध्ये प्रकृती अस्वास्थ्यामुळे राजीनामा दिल्याचं त्यांनी म्हटलं होतं .

दरम्यान घरगुती हिंसाचार प्रकरणात वांद्रे न्यायालयानेही राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार धनंजय मुंडे यांना दोषी ठरवत करुणा मुंडे यांना दरमहा दोन लाख रुपयांची पोटगी द्यावी असे आदेश दिले होते .घरगुती हिंसाचार प्रकरणातही धनंजय मुंडे यांचा पाय खोलात गेल्याचे दिसले .

दरम्यान, पदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या खात्याची जबाबदारी अजित पवार गटाच्या छगन भुजबळांना दिल्यानंतर मंत्रिमंडळात येण्याची मुंडेंची आशा मावळल्याची चर्चा आहे .आता धनंजय मुंडे थेट विपश्यना केंद्रात दाखल झाल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्यात .

---

### वाढदिवसाच्या निमित्ताने हलिमा शेख यांच्या कार्याचा आढावा....

# समाज कार्य, लोकशाही टिकवणे हेच ध्येय: हलिमा शेख

हलिमा शेख एक राजकीय, सामाजिक कार्याचे अष्टपैलू महत्व असलेली व्यक्तिमत्व त्यांच्याच शब्दात जाणून घेऊ.

मी हलीम अल्लूहाबकश शेख महाराष्ट्रात २००४ ला पुणे येथे आले. आल्यावर काही दिवस नातेवाइकांना कडे राहिले,काही महिने शिवाजीनगर रेल्वे स्टेशन येथे राहिले. कालांतराने मी माझ्या मुला बाळां सोबत पाटील इस्टेट मध्ये राहण्यास सुरुवात केली. लोकांची घरकामे करून मुलांचे पालन पोषण व शिक्षण करू लागली. पुढे जाऊन मी समाजसेवा करण्याचे धोरण मनात ठेवले. त्यावेळेस मी काही महिलांना सोबत घेऊन महिला बचत गटाची सुरुवात केली. माझी अनेक राजकीय व सामाजिक कार्यकर्ते सगळे एकत्रित येऊन आम्ही सामाजिक कार्यां ची सुरुवात केली. त्यावेळी मी अनेक राजकीय व सामाजिक संघटनांमध्ये पदाधिकारी म्हणून सामाजिक कार्य केले. मी माझ्या स्वत:च्या मेहनतीने व स्वत:ला खंबीरपणे मन घट्ट ठेऊन माझ्या संस्थेची स्थापना केली .२०१६/१७ मध्ये स्वयं प्रेरणा विकास संस्था म्हणून स्थापन. परिस्थिती हलाक्याची असल्यामुळे आर्थिक टंचाई येऊ लागली त्यामध्ये मला कॉंग्रेसचे मा.आमदार विनायक निमन यांनी खूप सहकार्य केले.

मी २००४ ते २०२५ पर्यंत मी अनेक सामाजिक– राजकीय पक्षासोबत पदाधिकारी म्हणून कार्य केले. शेवटी समाजाला न्याय



मिळवून द्यायचा असेल तर त्यांच्या हक्कासाठी पत्रकारिता हेच एक पर्याय असल्याचे दिसून आले. म्हणून मी पत्रकारितेत लोकशाही पत्रकार संघांचे प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण खान यांच्या माध्यमातून सं.अ.बीबी वैद्य सर यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या साप्ताहिक /दैनिक युवती राज वृत्तपत्राची उपसंपादक म्हणून मला संधी दिली. तसेच लोकशाही पत्रकार संघाच्या महिला आघाडी प्रदेश उपाध्यक्ष म्हणून ही मोठी जबाबदारी तर दिलीच त्याच सोबत महिला अन्याय अत्याचार निर्मूलन समिती च्या प्रदेश अध्यक्ष पदी निवड करून अयुब सर आणि वैद्य सर यांनी माझ्यावर जो विश्वास दाखविला त्याला तडा जाऊ देणार नाही. राज्यात जेथे कुठे महिलांवर अन्याय – अत्याचार होतील तिथे पाहिलं मी जाऊन त्या महिलांना न्याय मिळवून देणार. साप्ताहिक युवती राज च्या वर्तमान पत्रातून अनेक लोकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न मी करिन हे ही तितकेच खरं. लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्यात च मोठं करणार नाही तर संपूर्ण भारतात संघ मोठा करिन असं ही नमूद करते. येथून पुढचा माझा प्रवास फक्त आणि फक्त आता समाज सेवा आणि पत्रकारिता सोबत प्रत्येक तालुका आणि जिल्ह्यात सर्व सामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी पत्रकारांचा कट्टा हे चालू करून या मध्यमातून अनेकांचे प्रश्न सोडविणार आहे. प्रत्येक प्रश्नाचे निरासन करण्यासाठी पत्र व्यवहार, फोन, प्रत्येक्षात भेटून प्रश्न सोडविणार आहे. असे ही लोकशाही मध्ये हुकूम शाही चालवीणाऱ्या विरोधात आंदोलन, मोर्चा, उपोषण करिन पण सर्वसामान्यांना न्याय मिळवून देईल. हाच माझा ध्यास राहील. कारण मला आजपर्यंत माझ्या समाजाने, गोरगरीब जनतेने जे मला दिलं. ते मला परत देणं गरजेच आहे हा उद्देश समोर ठेवून मी समाजासाठी अहोरात्र प्रयत्न करीन.

---

पान १ वरून पुढे...

### बीड शहरात...

जोरदार झाली आहे. त्यामुळे पावसाळ्याअगोदरच बीड शहरातील दोन्ही नद्यांना पाणी आले आहे. तसेच बीड शहराला लागून असलेल्या पाली येथील बिंदुसरा धरण प्रकल्पही, जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या अहवालानुसार ८० टक्के क्षमतेने भरले आहे. मान्सूनपूर्व अतिवृष्टीमुळेच ८० टक्के भरलेले धरण आगामी पावसाळा काळात होणारा पाऊस आणि पाण्याची आवक यामुळे साहजिकच आणखी जास्त प्रमाणात भरले जाणार आहे. त्यामुळे बीड शहरातून वाहणार्या बिंदुसरा नदीला पूर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने, नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देऊन पूर परिस्थितीबाबत तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

### धनंजय मुंडेंच्या...

सुप्रसिद्ध असून पर्यटनाच्या दृष्टीने तो अत्यंत उपयुक्त आहे. मात्र मागील अनेक वर्षांपासून नागरी सुविधांमुळे तो वंचित राहिलेला आहे. या किल्ल्याच्या संवर्धनासह येतील ऐतिहासिक ठेवा जोपासण्याच्या उद्देशाने, तेच प्राचीन महत्त्व असलेले बारा खांबे मंदिर व खोलेश्वर मंदिर यांच्या जीर्णोद्धाराचा व या परिसराच्या विकासाचा प्रश्न मार्गी लावल्यामुळे सर्व स्तरातून धनंजय मुंडे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### बदलीसंदर्भात...

कोयत्याने भारत चाटेच्या मानेवर घाव घालण्याचा प्रयत्न केला. मात्र, भारत चाटे यांनी तो वार चुकविण्याचा प्रयत्न करीत असताना तो वार डाव्या हाताच्या मनगटावर लागला. त्यानंतर गोकुळ सारूक याने पप्पू चाटे याच्यावर देखील कोयत्याने वार केला. यात पप्पू चाटे याच्या मनगट आणि मांडीवर वार लागला. या प्रकरणी भारत चाटे यांच्या तक्रारी वरून गोकुळ सखाराम सारुक, आप्पाराव गोकुळ सारुक, श्रीकृष्ण गोकुळ सारुक या तिघांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस

पान १ वरून पुढे...

उपनिरीक्षक उमेश निकम हे पुढील तपास करीत आहेत. सदर शिक्षक हा गावातील नागरिकांसह विविध व कार्यालयातील अधिकाऱ्यांना तो एक दैनिकाचा वार्ताहर असल्याचे सांगून दबाव टाकीत असल्याच्या देखील तक्रारी आहेत.

### बीड शहरातील...

जॉन्सन यांच्याशी प्राथमिक चर्चा झाली. पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर बीड शहरातील मुख्य रस्त्यावर लोकसहभागातून वृक्ष लागवड करण्यात येणार आहे, अशी माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली आहे. बीडमध्ये वृक्षलागवडीच्या नियोजनर्थ गुरुवारी (दि.२९) रोटरी क्लब ऑफ मीडटाऊन, आयएमए, पतंजली, क्रेडाई या संघटनांसोबत बैठक झाली. शहरातील मुख्य म ार्गावर पहिल्या टप्प्यात एक मार्ग निवडून वृक्ष लागवड केली जाणार आहे. रस्त्यावरील दुभाजक, रस्त्याच्या बाजूला उपलब्ध जागेवर झाडे लावण्याचे नियोजन सुरू आहे. पहिल्या टप्प्यात शहरातील चऱ्हाटा फाटा ते शिवाजी महाराज चौकापर्यंत २० मीटर अंतरावर १ झाड लावण्याबाबत चर्चा झाली. या मोहिमेसाठी अधिकाधिक सामाजिक संघटनांना सहभागी करू, तसेच वैयक्तिक पातळीवर योगदान देणार असल्याचेही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले. त्यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अभियंता राजेंद्र भोपळे यांच्याकडून वृक्ष लागवडीसाठी रस्त्याचा एक आराखडा मागविला आहे. या आराखड्यातून वृक्ष लावल्यानंतर रस्ता रुंदीकरण, विद्युत खांबांना अडथळा होऊ नये म्हणून ते तोडण्याची वेळ येणार नाही, या बाबी स्पष्ट होतील. या बैठकीस आयएमएचे जिल्हाध्यक्ष डॉ.अनंत म ुळे, सचिव डॉ.अमोल गीते, रोटरी क्लब ऑफ मीडटाऊनचे सदस्य संतोष पडोळे, लक्ष्मण मळेकर यांच्यासह नर्सरी चालक, वृक्षप्रेमी नागरिकांची उपस्थिती होती.

### राष्ट्रीय महामार्ग....

यात प्रवास करणाऱ्या तीन व्यक्ती व एका मुलाचे प्राण वाचले तर दोन व्यक्ती किरकोळ जखमी झाल्याची माहिती कळली आहे.

पान १ वरून पुढे...

### फडणवीस सरकारचा...

गतिमान व्हावे, कामकाजात सुसुत्रता यावी, दस्ताऐवज व माहिती सुरक्षित रहावी, निर्णय प्रक्रिया गतिमान व सुलभ व्हावे यासाठी शासकीय कामकाजात दि.१.४.२०२३ पासून ई ऑफीस प्रणालीचा प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीने संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुषंगाने उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागात ई–ऑफीस चा वापर करण्यासाठी वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. मात्र या विभागात सदर प्रणालीचा वापर होत नसलेचे निदर्शनास आलेने संदर्भाधीन क्र. (२) येथील कार्यालयीन आदेशान्वये दि.१.१.२०२४ पासून या विभागात ई–ऑफीस प्रणालीचा वापर करणे अनिवार्य केलेले आहे. त्यानंतरही ई–ऑफीस चा वापर होत नसलेने संदर्भाधीन क्र.(४) येथील पत्रांन्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत. अद्यापही या विभागांतर्गत शासकीय कामकाजात ई–ऑफीस चा प्रभावी वापर होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच महाराष्ट्र कार्यालयीन कार्यपद्धती –२०२३ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व टपाल इलेक्ट्रॉनिक स्वरूपातच तयार व जतन केले जावे. फिजीकल फाईल केवळ अत्यावश्यक परिस्थितीतच तयार केली जावी. प्रशासकीय प्रक्रियेमध्ये पारदर्शकता व कार्यक्षमता आणण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.१२ जुलै, २०२४ अनुसार धोरणात्म क निर्णय घेण्यात आलेला आहे. याशिवाय, नवीन नोंदी तयार करताना महाराष्ट्र कार्यालयीन कार्यपद्धतीचा वापर करावा.सर्व विभागांनी याचे पालन करणे बंधनकारक आहे, अशा प्रकारच्या सूचना मुख्य सचिवांनी संदर्भाधीन क्र. (५) येथील पत्रान्वये दिलेल्या आहेत.तसेच १५० दिवसांच्या कार्यक्रमामध्ये देखील ई–ऑफीसच्या प्रभावी वापराबाबत मुद्दा समाविष्ट केला असून सदर उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी गुणांकन (२५ गुण) ठेवण्यात आलेले आहे.

विभागाच्या अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांच्या कार्यालयात तसेच संबंधित सर्व सह सचिव/उप सचिव यांचेकडे येणारे टपाल कोणत्याही परिस्थितीत भौतिक स्वरूपात स्वीकारू नये. संबंधितांनी

पान १ वरून पुढे...

अशा प्रकारचे भौतिक टपाल स्वीकारण्यास विनंती केल्यास त्यांना सदरचे टपाल मध्यवर्ती टपाल केंद्रात जमा करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. ई–ऑफीस प्रणालीची निकड विचारात घेऊन राज्य शासनाकडून महाराष्ट्र कार्यालयीन कार्यपद्धती नियमपुस्तिका, १९६३ मध्ये सुधारणा करण्यात येऊन महाराष्ट्र कार्यालयीन कार्यपद्धती नियमपुस्तिका, २०२३ तयार करण्यात आलेली आहे. सदर नियमपुस्तिकेचे अवलोकन केले असता शासकीय कामकाज ई–ऑफीस च्या माध्यमातूनच करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे सदर नियमपुस्तिकेचे अवलोकन करून शासकीय कामकाज ई–ऑफीस च्या माध्यमातूनच करावे. उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभागातील सर्व प्रभागांच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालयांना देखील ई–ऑफीस प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यात येत आहे. कोणत्याही परिस्थितीत भौतिक स्वरूपात टपाल पाठविले जाणार नाही, याची दक्षता सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी घ्यावी.

सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल, याची दक्षता घेण्यात यावी. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक क्रमांक २०२५०५२९११०२५५१८१० आहे. सदर शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

### नवऱ्यानं दुसरं...

महिलेची तक्रार काय– पोलीस पैसे घेऊन आपल्या पतीला मदत करत असल्याचा आरोप आत्मदहन करणाऱ्या महिलेने केलाय. अपहरणाची केस करू असे धमकावल्याचा आरोप महिलेने पोलिसांवर केला. आत्मदहन करणारी महिला धाराशिवच्या वाशी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये असलेल्या धनेश्वरी बोरगाव येथील रहिवाशी असल्याची माहिती मिळालीय. दरम्यान महिलेच्या हातातील ज्वलनशील पदार्थ हिसकावण्यासाठी पोलीस कर्मचारी आणि महिलेत झटापट झाली. भर पावसात महिला आणि कर्मचाऱ्यांमध्ये झटापट झाल्याचं व्हायरल व्हिडिओमध्ये दिसत आहे.

---

पान ४ वरून पुढे...

### अडीच हजार...

व्यवसाय सुरू असल्याची माहिती डीवायएसपी पूजा पवार यांना मिळाली होती. त्यांनी आपल्या टीमसोबत लॉजवर छापा मारला. त्यावेळी दोन महिला वेश्या व्यवसाय करताना आढळल्या. पोलिसांनी लॉजचे मालक परमेश्वर सव्वाशे आणि मॅनेजर रामेश्वर सव्वाशे यांना ताब्यात घेतले. त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संघर्ष लॉजवर वर्षभरापासून वेश्या व्यवसाय सुरू होता. लॉजवर वेगवेगळ्या ठिकाणाहून महिला व मुली येत होत्या. त्यांच्याकडून दोन ते अडीच हजार रुपये दराने वेश्या व्यवसाय करून घेतला जात होता.

डीवायएसपी पूजा पवार यांना ही माहिती मिळताच त्यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची परवानगी घेतली. त्यानंतर त्यांनी लॉजवर छापा मारून हे रॅकेट उध्वस्त केले. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या कारवाईबाबत बोलताना एका नागरिकाने सांगितले की, वडवणी पोलिसांना जे जमले नाही ते पोलीस उपाधीक्षक पूजा पवार यांनी करून दाखवले. ही कारवाई पोलीस उपाधीक्षक पूजा पवार, पीएसआय गोलवाल, मुरली गंगावणे, जिवाजी गंगावणे, महेश गरजे, अनिल मदने व माने मॅडम यांनी केली. या घटनेनंतर पूजा पवार यांच्या कामाचे कौतुक होत आहे. त्यांनी अवैध धंद्यांवर जरब बसवली आहे. त्यांच्या धडाकेबाज कामगिरीमुळे गुन्हेगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक नागरिक त्यांच्या कामाबद्दल समाधान व्यक्त करत आहेत.

जर कारवाईची मोहीम हाती घेतली तर अवैध धंदेवाल्यांचा सफाया होऊ शकतो, असे नागरिकांचे म्हणणे आहे. पूजा पवार यांच्या कार्यामुळे इतर पोलीस अधिकाऱ्यांनाही प्रेरणा मिळाली आहे. त्यांनी अवैध धंद्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची गरज आहे, असे मत काही

पान ४ वरून पुढे...

जाणकारांनी व्यक्त केले आहे.

### 'अकौंटंटने केला...

फिर्यादी गांधी यांच्या आई उमा गांधी यांच्या नावे नगरमध्ये २०१२ मध्ये इलाईट इंटरनॅशनल या नावाची फर्म सुरु करण्यात आलेली असून, त्याचे मुख्य कार्यालय नगरमध्ये तेलीखुंट येथे आहे. कंपनीचे एक कार्यालय चाकण येथेही आहे. या कंपनीमार्फत देशात तसेच परदेशात इंडस्ट्रीयल पॅकेजिंग, इंडस्ट्रीयल कंपोनंट, टो पार्टच्या आयात निर्यातीचा व्यवसाय चालतो. या कंपनीत दैनंदिन व्यवहाराचा हिशोब ठेवण्यासाठी तसेच विविध पेमेंट करण्यासाठी सिनियर अकौंटंट म्हणून पुनीत गुगळे व ज्युनियर अकौंटंट म्हणून अन्सार शेख यांना कामावर ठेवण्यात आलेले होते. अनेक वर्षे ते काम करत असल्याने कंपनीचे सर्व आर्थिक व्यवहार तेच पाहत होते. कंपनीचे मालक असलेल्या फिर्यादी व त्यांच्या कुटुंबियांचा या दोघांनी विश्वास संपादन केलेला होता. खोट्या नोंदी करून या दोघांनी हा अपहार केल्याचे निदर्शास आल्यानंतर तोफखाना पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### मुंबई पोलिसातील...

धाडसी ऑपरेशन केले. २००४ पर्यंत त्यांनी ८५ पेक्षा जास्त एन्काउंटर करत मुंबईतील अनेक कुख्यात गुन्हेगाऱ्यांना कायमचा आळा घातला. त्यामुळे त्यांचं नाव गुन्हेगारांमध्ये भीतीचं आणि नागरिकांमध्ये विश्वासाचं प्रतीक बनलं.

ड्रग्ज माफियांविरोधात निर्णायक लढा– अलीकडच्या काळात दया नायक यांनी मुंबईतील ड्रग्ज माफियांविरोधात प्रभावी मोहीम राबवली.

पान ४ वरून पुढे...

उपनगरांमध्ये सक्रिय असलेल्या अंमली पदार्थांच्या रॅकेटवर त्यांनी धडक कारवाई करून अनेक नेटवर्क्स उद्ध्वस्त केली. त्यांनी महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथक (ढड) मध्येही काम केलं असून, संघटित गुन्हेगारीच्या विरोधातील त्यांच्या कारवायांमुळे त्यांचं कौतुक केलं जातं.

पदोन्नती म्हणजे कर्तृत्वाची पावती– दया नायक यांची एसीपी पदावर झालेली बढती ही केवळ एक पदोन्नती नाही, तर गेल्या अनेक वर्षांतील त्यांच्या निष्कलंक, समर्पित आणि प्रभावी सेवेला दिलेला सन्मान आहे. संघटित गुन्हेगारी, अंडरवर्ल्ड, आणि ड्रग्ज जाळ्याविरुद्ध लढा देणाऱ्या या 'खऱ्या हिरो'ला आज संपूर्ण महाराष्ट्र सलाम करत आहे. दया नायक यांचा प्रवास हा धैर्य, निष्ठा आणि लोकसेवेच्या आदर्शाचा प्रेरणादायक मार्ग आहे. एसीपी पदावरून ते आणखी मोठी जबाबदारी सांभाळणार आहेत, आणि भविष्यातही त्यांनी गुन्हेगारीविरोधात अधिक तीव्र आणि प्रभावी लढा उभारावा, हीच अपेक्षा आहे.

### आत्महत्याग्रस्त शेतकरी...

३१ एप्रिल २०२५ या ४ महिन्यात ९२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन बीड जिल्ह्यातील पात्र ५५ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबिय मदतीच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांना तातडीने निधी देण्यात यावा या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे व त्यांचे सहकारी शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, पांडुरंग हराळे,शेख मुस्ताक, रामनाथ खोड, माजी सैनिक अशोक येडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अजितदादांचे विकासाचे गाजर वाटप लक्ष्यवेधी आंदोलन करत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना

पान ४ वरून पुढे...

शासकीय मदतनिधीची पालकमंत्री अजितदादा पवार यांनी तरतूद करावी अशी मागणी केली होती. या मागणीची दखल घेऊन पालकमंत्री बीड अजितदादा यांनी जिल्हाधिकारी बीड यांना आदेश दिले आहेत.

### सोमवारी २ जून रोजी....

दिनांक २ जून २०२५ रोजी सकाळी १०–०० ते दुपारी १२–०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल जिल्हा लोकशाही दिनासाठी प्राप्त अर्ज सर्व संबधित विभागाकडे वेळीच पाठविण्यात आलेले आहेत. सदर अर्जासह अथवा नवीन अर्जासह अर्जदार जिल्हा लोकशाही दिनाच्या दिवशी उपस्थित राहणार आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# गेवराई शहराला स्मार्ट सिटी करणार: आ. विजयसिंह पंडित

## संत नरहरी महाराजांच्या पिटीआरचा प्रश्न आ. विजयसिंह पंडित यांनी एका महिन्यात मार्गी लावला

**गेवराई। प्रतिनिधी**

गेल्या तीस वर्षांपासून प्रलंबित असलेल्या संत नरहरी महाराज यांच्या मंदिराच्या पिटीआरचा प्रश्न मार्गी लावण्याचे भाग्य मला मिळाले याचा मला आनंद होत आहे. लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी आल्यानंतर आपण गेल्या सहा महिन्यांच्या काळात गेवराई शहरातील अनेक प्रश्न मार्गी लावले असून येणाऱ्या काळात शहराचा कायापालट करुन गेवराई शहराला स्मार्ट सिटी करणार असल्याची घोषणा आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी केली. संत नरहरी महाराज मंदिराचा अधिकृत पिटीआर शिष्टमंडळाकडे प्रदान करताना ते बोलत होते. गेवराई शहरातील सोनार समाजाचे आराध्य दैवत संत नरहरी महाराजांच्या मंदिराचा तीस वर्षापासून रखडत पडलेला पिटीआरचा प्रश्न आ. विजयसिंह पंडित यांनी एक महिन्यात मार्गी लावला असून गुरुवार दि.२९ मे रोजी मंदिरातच झालेल्या कार्यक्रमात सोनार समाजाच्या शिष्टमंडळाला आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते पिटीआर प्रदान करण्यात आला. याप्रसंगी बीड जिल्हा सराफा फेडरेशन अध्यक्ष गणेश बेदरे, नगरपालिकेचे मुख्याधिकारी मांडुरके, नगरसेवक शाम येवले, भगवानराव टाक, विष्णुपंत तपासे, रमेश टाक, विष्णुपंत टाक, शाम उडाणसिह, शहाणे सर, डॉ. पोतदार, सुधाकर, माळवे,गणेश बागडे,



अशोक पंडित,गोरख बेदरे, अशोक टाक, हेमंत चतुरमोहता, प्रल्हाद टाक यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना आ. विजयसिंह पंडित पुढे म्हणाले की, जनतेच्या आशिर्वाद मुळे गेवराई विधानसभा मतदारसंघाचा लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी मिळाल्यानंतर आपण मतदार संघासह गेवराई शहरातील विविध प्रश्न मार्गी लावलेले आहेत. सहा महिन्यात गेवराई शहरात शहरातील तसेच नगर परिषदेच्या हद्दीतील अनेक विकासाची कामे मार्गी लावली आहे. वेगवेगळ्या समाजघटकाला न्याय देण्याची भूमिका शिवछत्र परिवाराची आहे. अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली गेवराई विधानसभा मतदारसंघाला विकासाच्या वाटेवर आणलेले आहे. सामान्य जनतेचे मूलभूत प्रश्न सोडवण्याचा शिवछत्र परिवार कायम प्रयत्न करत आहे. यापुढील काळात गेवराई नगर परिषदेच्या हद्दीमध्ये विविध विकासाची कामे करून गेवराई शहराला स्मार्ट सिटी करणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली.

याप्रसंगी नगरसेवक शाम येवले, मुख्याधिकारी मांडुरके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामानंद तपासे यांनी केले. सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले तर उपस्थितांचे आभार पप्पु जोजारे यांनी मानले. यावेळी समाजबांधवासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अमरसिंह पंडित यांनी दिलेला शब्द आ. विजयसिंह पंडित यांनी पुर्ण केला

**सोनार समाजाचे आराध्य दैवत संत नरहरी महाराजांच्या मंदिराचा प्रश्न तीस वर्षापासून रखडलेला होता. मंदिर उभा करण्यासाठी समाज बांधवांकडून प्रयत्न केले जात होते. सोनार समाजाच्या शिष्टमंडळाने गेवराई नगर परिषद झालेल्या बैठकीमध्ये अमरसिंह पंडित यांना संत नरहरी महाराज मंदिराची अधिकृत नोंद करण्याची मागणी केली होती. यावेळी अमरसिंह पंडित यांनी एका महिन्याच्या आत संत नरहरी महाराजांच्या मंदिराचा अधिकृत पिटीआर मिळवून देणार असल्याचा शब्द दिला होता. अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी हा शब्द खरा करून पिटीआरचा प्रश्न मार्गी लावला आहे. सोनार समाज बांधवाकडून आ. विजयसिंह पंडित यांचे कौतुक करण्यात येत आहे.**

# खडकवाडी ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी पाटोदा पंचायत समितीसमोर अमरण उपोषण

**पाटोदा । प्रतिनिधी**

खडकवाडी ग्राम पंचायतीतील सरपंच व ग्रामसेवक यांनी सार्वजनिक निधीचा गैरवापर केल्याच्या गंभीर आरोपांमुळे ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते ज्ञानदेव लोंढे यांनी पाटोदा पंचायत समिती कार्यालयासमोर अमरण उपोषणास गुरुवार, दिनांक २९ मे २०२५ पासून सुरुवात केली आहे.




या उपोषणाला गावकऱ्यांचा मोठा पाठिंबा लाभत असून,उपोषणस्थळी घोषणाबाजी करत ग्रामपंचायतीतील आर्थिक अपहार, बोगस ठराव, योजनांचा गैरवापर आणि लाभार्थ्यांवर अन्याय झाल्याच्या घटना उघड केल्या जात आहेत.उपोषणामागील प्रमुख मागण्या:सरपंच अपात्र ठरवून कारवाई करावी, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १६(१४)(अ) अंतर्गत कारवाई करावी.ग्राम पंचायत खडकवाडी दलित वस्तीमध्ये काम न करता सरपंच व ग्रामसेवक यांनी अपहर केलेल्या ₹४,३६,४९१/- रकमेची वसुली करावी.ग्रामपंचायत अंतर्गत वैयक्तिक शौचालय अनुदान तात्काळ लाभार्थ्यांना वितरित करावे.ग्रामसभा व मासिक सभा न घेता बोगस ठराव करून नरेगा अंतर्गत सिमेंट रस्ता व पेव्हर ब्लॉकच्या कामांची कुशल बील ऑनलाईन न केल्याबद्दल चौकशी करावी.

प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेतील प्रस्ताव सरपंच व ग्रामसेवक यांनी सादर न केल्यामुळे लाभार्थ्यांवर झालेला अन्याय दूर करावा.ज्ञानदेव लोंढे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, जोपर्यंत चौकशी सुरू होत नाही आणि दोषींवर गुन्हे दाखल होत नाहीत, तोपर्यंत हे उपोषण मागे घेण्यात येणार नाही. प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष या प्रकरणामुळे प्रशासनावर दबाव वाढला असून, ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना आहे. आंदोलनकर्त्यांनी मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

# केज येथे माळेगाव ते चौंडी पुण्यश्लोक अहिल्यादेवी रथयात्रेचे उत्साहात स्वागत

### अहिल्यादेवी होळकरांनी समतेचा विचार दिला : प्रा डॉ कुंभारगावे

**केज । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षापासून नांदेड जिल्ह्यातील माळेगाव येथून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची मूर्ती रथामध्ये घेऊन पायी दिंडी ३१ मे पर्यंत चौंडी ला जात असते या वर्षी या दिंडीचे आगमन बुधवार रोजी दुपारी केज येथे झाले.

केज शहरात नागरिकांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या रथाचे दर्शन घेऊन स्वागत केले .रथयात्रा दिंडीसाठी दुपारी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी ह भ प संभाजी महाराज धुळगंडे,प्रा डॉ मुरहरी कुंभारगावे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ कुंभारगावे म्हणाले अहिल्यादेवी होळकरांचे विचार समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत असे मत व्यक्त केले.



अहिल्यादेवीचे विचार सर्वांच्या मनावर रुजले पाहिजेत असे मत ह भ प संभाजी महाराज धुळगंडे यांनी व्यक्त केले. लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचा विचाराचा जागर करत ही दिंडी अहिल्यादेवींचे चे जन्मस्थळ चौंडी येथे ३१ मे रोजी जयंती दिनी पोहोचणार आहे. महापुरुषांच्या विचारांचा जागर करण्यासाठी केज शहर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी दर्शना सह प्रबोधन कार्यक्रम घेण्यातआला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बाळासाहेब गाढवे ,संजय रोडे, सिध्देश्वर गावड़े , कृष्णा रोडे, अशोक रोड़े, ओम चादर, राजेभाऊ डुकरे, शिवाजी चेपट , तात्या रोड़े, बबलू रोड़े बालासाहेब गायके, जयदेव रोडे, पप्पू लांडगे, सुरज चादर ,बालाजी चादर, आबाराव लांडगे, मेघराज गावड़े , रुहिदास गावड़े, सुखदेव लांडगे, शाहादेव सौदागर,डिंगाबर निगुळे, बालासाहेब, भुतकर, रामकिसन सौदागर, सतीष रोड़े, प्रभावती अनंत चादर, पार्वती सतीष रोडे, केवळबाई वसंत सौदागर, पुष्पा बाई सुखदेव लांडगे, काशिबाई काशिनात रोडे परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ हनुमंत सौदागर यांनी केले. दर्शन सोहळ्यास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कालिका पोदार लर्न स्कुलची विद्यार्थी कु. अवसरे तालुक्यात प्रथम

**आष्टी । प्रतिनिधी**

जामखेड येथील सीबीएससी बोर्ड मान्यताप्राप्त कालिका पोद्दार लर्न स्कूलमध्ये यावर्षी इयत्ता १० वी.च्या विद्यार्थ्यांनी बोर्ड परिक्षेमध्ये उत्कृष्ट निकालाची परंपरा सलग दुसऱ्या वर्षीही कायम राखली आहे. या विद्यार्थ्यांमध्ये कु. गार्गी अवसरे ९५.६० टक्के(प्रथम), श्रेयश राख ९४.४० टक्के (द्वितीय), लाभेश चोपडा ९४.२० टक्के (तृतीय) क्रमांक पटकाविला. ५८ विद्यार्थ्यांपैकी ३१ विद्यार्थ्यांनी ८० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून



उत्तीर्ण झाले.शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा लावला असून जाम खेड,पाटोदा,आष्टी तालुक्यात पहिला नंबर पटकावला आहे.

याहीवर्षी शाळेचे व्यवस्थापक या समवेत शाळेचे प्रिन्सिपल व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे हे यश शक्य झाले असे कौतुक विद्यार्थी व पालकांनी केले. या यशाचे परिसरामध्ये सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# गर्भवती हरिणीवर कुत्र्यांचा हल्ला ; हरिणीला वाचविण्याचे प्रयत्न निष्फळ

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील शेतकरी प्रजित प्रताप भोंडवे यांच्या शेतातील घरामागे सकाळी ७ वाजता कुत्र्यांच्या भुंकण्याचा गोंगाट ऐकु आला. प्रताप व प्रजित बापलेकांनी धाव घेतली असता त्याठिकाणी हरणांवर कुत्र्यांचा कळप हल्ला चढवताना दिसला. त्यांनी कुत्र्यांच्या तावडीतून हरणाची सुटका करत तिला पाणी पाजले आणि डॉ.गणेश ढवळे यांच्या घरी बैलगाडीत टाकुन आणले. डॉ.गणेश ढवळे यांनी लिंबागणेश येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.अर्जुन पवार यांना बोलावून घेतले. वनविभागाचे कर्मचारी यांना फोनवरून कल्पना दिली. डॉ. अर्जुन पवार, परिचर सुधाकर देशमुख यांनी



गर्भवती हरणीवर उपचार करून वाचवण्याचे प्रयत्न केले परंतु कुत्र्यांनी हरणीच्या मानेवर व ईतर ठिकाणी गंभीर चावे घेतल्यामुळे हरिणीने प्राण सोडले. वनविभागाचे कर्मचारी वनरक्षक महेश मेटे , वनकर्मचारी अनिल शेळके, गौतम वीर, हनुमंत वायभट, मधुकर वायभट वनविभागाची गाडी घेऊन लिंबागणेश येथे पोहोचले. हरिणीला त्यांच्या ताब्यात दिले. गर्भवती हरिणी असल्याने लिंबागणेश येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात पोस्टमार्टेम करून हरीणीच्या गर्भातील पाडसाला वाचवण्याचा प्रयत्न डॉ. अर्जुन पवार व परीचर सुधाकर वैद्य यांनी केला परंतु दुर्दैवाने मृतावस्थेत आढळून आले. मृत हरणीचे शरीर वनविभाग कर्मचाऱ्यांच्या हवाली करण्यात आले. गर्भवती हरिणीला वाचविण्यात शेतकरी पुत्र प्रजित भोंडवे आणि पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.अर्जुन पवार यांचे निकराचे प्रयत्न निष्फळ ठरले.

# तहसील कार्यालयात प्रत्येक सोमवार आणि गुरुवारी जनता दरबार आयोजित करण्याचे निर्देश जारी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील जनतेचे प्रश्न समजावून घेऊन त्यावर वेळीच मार्ग काढण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार मंगळवार आणि गुरुवार या दिवशी जनता दरबार आयोजित करण्यात येत आहे. यातील बहुसंख्य प्रश्न उपविभाग आणि तालुकास्तरावर सुटण्यासारखे आहेत यामुळे आगामी काळात उपविभाग आणि तालुकास्तरावर जनता दरबार आयोजित करण्यात यावे असे परिपत्रक जिल्हाधिकारी बीड यांच्यातर्फे जारी करण्यात आले आहे. लोकांचे प्रश्न समजावून घेऊन वेळेवर सोडवणूक करण्यासाठी शासनाने अभ्यागतांसाठी वेळ राखून ठेवण्याचे निर्देश १५ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयाद्वारे जारी केलेले आहेत त्यानुसार जिल्हास्तरावर आठवड्यातून तीन दिवस जनता दरबारचे आयोजन करण्यात येत आहे. उपविभाग आणि तालुकास्तरावर जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक होत नसल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित होत असलेल्या या जनता दरबारात मोठी गर्दी होत आहे, या पार्श्वभूमीवर हे परिपत्रक जारी करण्यात आले आहे. तालुकास्तरावर या पुढील काळात प्रत्येक तहसील कार्यालयात सोमवार आणि गुरुवार या आठवड्यातील दोन दिवस जनता दरबाराचे आयोजन करण्याचे या परिपत्रकात निर्देशित करण्यात आले आहे. सर्व उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्या उपविभागातील एका तालुक्यात त्यांच्या सोयीनुसार या जनता दरबारात उपस्थित राहावे असेही या परिपत्रकात म्हटले आहे. प्रत्येक सोमवार आणि गुरुवार हा जनता दरबार होईल, यात दुपारी १२ ते २ या वेळेस जनतेचे प्रश्न समजून घेऊन त्याचे निराकरण करावे तसेच या दिवशी संबंधित अधिकाऱ्याने दौरा अथवा बैठकीचे आयोजन करू नये असे या परिपत्रकात म्हटले आहे.

# ट्रॅव्हल्स बसचा उदगीरकडे जाताना पहाटेच्या वेळी अपघात, दोन ठार, 34 जण जखमी

**लातूर । प्रतिनिधी**

लातूर सोलापूर महामार्गावर अपघाताची श्रृंखला काही थांबण्याचे नाव घेत नाही. चार दिवसांपूर्वी माजी आमदार आर टी देशमुख यांचाही अपघात लातूर सोलापूर महामार्गावर झाला. त्या अपघात स्थळापासून काही अंतरावरच आज पहाटे पुण्यावरून लातूरला येणाऱ्या दोन ट्रॅव्हल्स मध्ये भीषण अपघात झाला आहे. तुळजापूर लातूर महामार्गावरील आशीव पाटी येथे हा अपघात झाला. अपघातात ३० ते ३४ जण गंभीर जखमी, तर दोघांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. अपघातस्थळी पोलीस दाखल झाले असून रुग्णवाहिकेद्वारे रुग्णांना हलवण्याचे काम सुरू झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यावरून लातूरकडे येत असलेल्या एका ट्रॅव्हल्स ने दुसऱ्या ट्रॅव्हल्स ला




पाठीमागून धडक दिली आहे. हा अपघात तुळजापूर-लातूर या राष्ट्रीय महामार्गावरील आशीव पाटी येथे झाला आहे. अपघातात ३० ते ३४ जण गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. या अपघातात आतापर्यंत दोघांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. अपघातस्थळी पोलीस दाखल झाले आहेत. आत्तापर्यंत ५ रुग्णवाहिका अपघात स्थळी दाखल झाल्या आहेत. रुग्णांना लातूरच्या शासकीय रुग्णालयात हलवण्याचे काम सुरू आहे.

# बीड शहरातील रिपाइंच्या वतीने दि ३० मे रोजी भारत जिंदाबाद यात्रेचे आयोजन : अविनाश जावळे

**माजलगाव । प्रतिनिधी**

देशाच्या सैनिकांनी युद्धखोर पाकिस्तान ची कुमकुम जिरवली भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी रिपाईच्या वतीने आयोजित केलेल्या भारत जिंदाबाद रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन रिपाईचे तालुका अध्यक्ष अविनाश जावळे यांनी केले आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते की मी प्रथम भारतीय आणि अंतिम ही भारतीय आहे यामुळे देशाचे सार्वभौमत्व महत्त्वाचे आहे भारतीय सैनिकांनी पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानातील अतिरेकीचा तळ उध्वस्त केले देशासाठी लढलेल्या सैनिकाचे मनोबल उंचविण्यासाठी आणि त्यांच्या शौर्य सलाम करण्यासाठी रिपाईचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले साहेब यांच्या आदेशानुसार व रिपाईचे प्रदेशाध्यक्ष पप्पूजी कागदे



साहेब यांच्या नेतृत्वाखाली बीड येथे दि ३० मे रोजी भारत जिंदाबाद रॅली आयोजीत केली आहे ही भारत जिंदाबाद रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत आयोजित केली आहे. भारत जिंदाबाद रॅलीत माजलगाव तालुक्यातील रिपाईच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे वाहन तालुका अध्यक्ष अविनाश जावळे यांनी केले आहे भारत जिंदाबाद रॅली तालुक्यातील जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी सहभागी होण्यासाठी अविनाश जावळे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

CMYK

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

शुक्रवार, दि.३० मे २०२५ पान ४

## अंबाजोगाई बसस्थानकात भीषण अपघात : बसखाली येऊन तरुणाचा मृत्यू



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

गुरुवार, दिनांक २९ मे रोजी सकाळच्या सुमारास अंबाजोगाई बस स्थानकाच्या प्रवेशद्वारावर एक दुर्दैवी अपघात घडला. एमएच १४ एमएच १७०१ या क्रमांकाच्या एस.टी. बसच्या खाली येऊन एक तरुण चिरडला गेला. या अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला. मयत तरुणाचे नाव अंकुश मोरे (रा. धानोरा बु., ता. अंबाजोगाई) असे आहे. स्थानकाच्या पश्चिम प्रवेशद्वाराने आतमध्ये प्रवेश करत असताना सदरील बसने अंकुश यांस चिरडले. अपघातानंतर त्यांना गंभीर अवस्थेत स्वाराती रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला असल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणी पुढील तपास अंबाजोगाई पोलीस करत आहेत.

# दौंड-इंदोर एक्सप्रेसला अहिल्यादेवी होळकरांचे नाव द्या

## खा.बजरंग सोनवणेंची केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे मागणी, अहिल्यानगरपर्यंत रेल्वे सुरू करण्यासाठी आग्रह



**बीड । प्रतिनिधी**

दौंड-इंदोर एक्सप्रेस गाडीला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक्सप्रेस' असे नाव देण्यात यावे, तसेच या गाडीचा विस्तार अहिल्यानगर (अहमदनगर) पर्यंत करावा, अशी मागणी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान महाराष्ट्र व मध्यप्रदेशासाठी अतुलनिय आहे. त्यांच्या स्मृतीस आदरांजली ठरावी आणि या भागातील प्रवाशांना अधिक सोयीचा रेल्वेमार्ग उपलब्ध व्हावा, हा यामागचा उद्देश आहे. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, दौंड-इंदोर या रेल्वेगाडीस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक्सप्रेस असे नाव देण्यात यावे, अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान महाराष्ट्रासह मध्यप्रदेशसह अनेक राज्यात महत्वपूर्ण आहे. सदरील गाडीला अहिल्यादेवी यांचे नाव दिल्यास सदरील रेल्वेला नवी ओळख मिळेल. सदरील गाडी आता इंदोर ते दौंड अशी चालत आहे. सदरील गाडीचा विस्तार करून अहिल्यानगरपर्यंत करणे आवश्यक आहे. तसे झाल्यास मराठवाड्यातील यात्रेकरू भाविकांना याचा लाभ होईल. पूण्यश्लोक आहिल्सादेवींचे जन्मस्थान आहिल्यानगर जिल्ह्यात आहे. मराठवाड्यातील नागरिकांना थेट इंदोरला जाणे सोपे होईल. सदरील सेवा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जन्म जयंती ३१ मे रोजी येत असल्याने ३० मे २०२५ पासूनच सुरू करावी, यामुळे जन्मदिनानिमीत्त हा सन्मान ठरेल, असेही पत्रात म्हटले आहे.

## छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त बुलंद छावाचा समाज रत्न पुरस्कार, व्याख्यान व गुणगौरव सोहळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त यावर्षीचा बुलंद छावाचा समाज रत्न पुरस्कार,व्याख्यान, मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला आहे.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी वर्ष दहावे गुरुवार दि. २९ मे २०२५ रोजी सकाळी ११ वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बीड येथे बुलंद छावा मराठा युवा परिषद बीड आयोजित स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त इयत्ता दहावी व इयत्ता बारावी मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा प्रमुख मान्यवर ज्येष्ठ नेते विलास बडगे, शिवसेनेचे जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे,शिवसंग्रामचे नेते अनिल घुमरे,शिक्षक संघटनेचे नेते श्रीराम बहीर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला व शिवचरित्रकार श्री ज्ञानदेव काशीद यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते दरवर्षी समाजातील आदर्श व्यक्तीचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो यावर्षीचा



पुरस्कार साम टीव्ही चे बीड जिल्हा प्रतिनिधी श्री योगेश काशीद, अड. शशिकांत सावंत, श्री प्रशांत मस्के सर यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आला आहे या कार्यक्रमाचे आयोजन बुलंद छावाचे बीड जिल्हाध्यक्ष विठ्ठल बहीर यांनी केले बुलंद छावाचे पदाधिकारी नारायण गवते, आजिनाथ आदमाने, जीवन धांडे, पांडुरंग गवते, विजय पवार यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास अड. विनायकराव जाधव,राष्ट्रीय छावा जिल्हाध्यक्ष युवराज मस्के, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गणेश मस्के, कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत बागलाने, मराठा सेवक संजय गोडसे, संतोष डोंगरे महाराज, सुरेश ढास, गोविंद वायकर, भागवत मस्के,कल्याण भवर, खुरणे मॅडम यांच्यासह विद्यार्थी, पालक व शंभू प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*बीड पावसामुळे रेल्वे पटरीच्या दोन्ही साईट माती व गोट्याने भर टाकल्याने मोठ मोठ्या भेगा व सर्व माती खाली घसरत आहे त्यामुळे रेल्वे पट्ट्या बाजूला बाजूला सरकत आहे. (छाया: दीपक गायकवाड, बीड )*



*बीड : बिभीषण क्षीरसागर सर यांना सर्वज्ञ युवा फाउंडेशन पुणे या संस्थेतर्फे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ देण्यात आला. या वेळी त्यांना शुभेच्छा देताना वायभट सर, विष्णु घोडके, दत्ता थापडे, सचिन नरनाळे, अविनाश लांडे, महादेव आमटे, अनिरुध्द क्षीरसागर. आदी छायाचित्रात दिसत आहेत.*

## अडीच हजार रुपये दराने सुरु होता 'व्यापार', डॅशिंग DYSP पूजा पवार यांनी लॉजवर धाड टाकली अन् 'त्यांना' रंगेहाथ पकडलं

**बीड । प्रतिनिधी**

प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक पूजा पवार यांनी वडवणीमध्ये मोठी कारवाई केली आहे. त्यांनी एका लॉजवर छापा मारून वेश्याव्यवसाय उघडकीस आणला. या कारवाईत दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली. तसेच, दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. पूजा पवार यांनी यापूर्वी पिंपळनेरमध्येही अवैध धंद्यांवर कारवाई केली होती. त्यामुळे त्यांची जिल्ह्यात चर्चा आहे. पूजा पवार यांनी



वडवणीत केलेल्या कारवाईमुळे अवैध धंदेवाल्यांमध्ये खळबळ उडाली आहे. त्या प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक असल्यामुळे जिल्ह्यात कुठेही कारवाई करू शकतात. त्यामुळे बीड शहरासह जिल्ह्यात त्यांनी कारवाईची मोहीम हाती घेतल्यास अवैध धंदेवाल्यांचा सफाया होऊ शकतो, अशी प्रतिक्रिया नागरिक देत आहेत.

वडवणी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील साळींबा रोडवर संघर्ष लॉज आहे. या लॉजवर वेश्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## 'अकौंटंटने केला 10 कोटींचा अपहार': नातेवाईकांच्या बँक खात्यात पैसे पाठविले; दोघांवर गुन्हा दाखल

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

एका कंपनीत अनेक वर्ष सिनियर व ज्युनियर अकौंटंट म्हणून काम पाहणाऱ्या दोघांनी वेळोवेळी नऊ कोटी ८१ लाख रूपये स्वतःच्या व नातेवाईकांच्या बँक खात्यात टाकून अपहार केला. याप्रकरणी शहरातील दोघांविरुद्ध तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुनीत अभयराज गुगळे (रा. कोर्टगल्ली,



अहिल्यानगर ) व अन्सार निसार शेख (रा. गजराजनगर, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

शहरात मुख्य कार्यालय आणि पुणे जिल्ह्यातील चाकण एमआयडीसी येथे शाखा कार्यालय असलेल्या इलाईट इंटरनॅशनल या कंपनीत हा २०२० ते जानेवारी २०२५ या कालावधीत अपहार झाला आहे. या प्रकरणी कंपनीचे मालक अभिजित विनोद गांधी (वय ३८, रा. कराचीवाला नगर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर


## मुंबई पोलिसातील 'एन्काउंटर स्पेशालिस्ट' दया नायक यांना एसीपी पदावर बढती

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील गुन्हेगारी जगताला हादरवणाऱ्या कारवायांमुळे चर्चेत असलेले प्रसिद्ध पोलिस अधिकारी दया नायक यांना सहाय्यक पोलिस आयुक्त (CP) पदावर बढती मिळाली आहे.

ग्रामीण कर्नाटकापासून मुंबईपर्यंतचा प्रवास

दया नायक हे मूळचे कर्नाटक राज्यातील करकला तालुक्यातील एन्नेहोल गावाचे रहिवासी. अत्यंत सामान्य पार्श्वभूमीतून आलेल्या



नायक यांनी कठोर परिश्रम, प्रामाणिक वृत्ती आणि धाडसी निर्णयांच्या जोरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. १९९५ साली त्यांनी मुंबई पोलिस दलात प्रवेश केला आणि अल्पावधीतच त्यांनी एन्काउंटर स्पेशालिस्ट म्हणून स्वतःचं नाव कमावलं. अंडरवर्ल्डला थारा नाही, दया नायक यांच्या ८५ हून अधिक एन्काउंटर

१९९० च्या दशकात आणि २००० च्या सुरुवातीला जेव्हा मुंबई अंडरवर्ल्डच्या सावटाखाली होती, तेव्हा दया नायक यांनी गुन्हेगारी विश्वाला आव्हान देणारे अनेक ▶▶ उर्वरित पान २ वर

### सोमवारी २ जून रोजी लोकशाही दिन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार ▶▶ उर्वरित पान २ वर




# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना महिनाभरात मदत मिळणार



## जिल्हाधिकारी महिन्यातुन दोन वेळा बैठका घेणार ; पालकमंत्री अजितदादा कडुन आंदोलनाची दखल : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

अवकाळी पाऊस,नापिकी, कर्जबाजारीपणा आणि बँकाचा कर्ज परतफेडीचा तगादा या प्रमुख कारणांमुळे मनोधैर्य खचलेला शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना १ लाख रुपयांची शासकीय मदत दिली जाते.बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित असुन त्यांच्या कुटुंबीयांना शासनामार्फत दिली जाणारी १ लक्ष रुपये मदत वेळेवर मिळणे बंधनकारक असताना महिनोंमहिने शासनाने निधी उपलब्ध करून न दिल्याने कुटुंबांची परवड होत होती. त्यामुळे राज्याच्या तिजोरीच्या चाव्या हाती असणारे उपमुख्यमंत्री वित्त मंत्री तथा नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी निधी उपलब्ध करून देण्यात यावा यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अजितदादांच्या विकासाचे गाजरवाटपआंदोलन करण्यात आले होते. या अनुषंगाने वारंवार पाठपुरावा केल्यानंतर अखेर पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी याची दखल घेत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना शासकीय मदत देण्याच्या हेडवर निधी उपलब्ध नसल्यास ईतर हेडमधुन तो निधी शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना देण्याचे निर्देश पालकमंत्री बीड यांनी जिल्हाधिकारी बीड विवेक जॉन्सन यांना दिल्याची माहिती काल दि.२८ बुधवार रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यालयात पार पडलेल्या बैठकीत दिली. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन स्वतः शेतकरी आत्महत्येचे प्रकरण मार्गी लावण्यासाठी महिन्यातुन दोन बैठका घेणार असुन तालुकास्तरावरून तहसीलदारांना आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांचे प्रस्ताव १५ दिवसांत जिल्हा समितीकडे पाठवावे असुन याबरोबरच जिल्हास्तरीय समितीने पात्र केलेल्या कुटुंबियांना शासकीय मदत देण्याची प्रक्रिया पुढील १५ दिवसात पूर्ण केली जाणार असल्याने महिनाभरात आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना आर्थिक मदत मिळणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांनी बैठकीत दिली.

बीड जिल्ह्यात १ जानेवारी २०२५ ते ▶▶ उर्वरित पान २ वर

CMYK